पुणे येथील मे.ज्युडि.मॅजि.सो। वर्ग-१, ए.सी.कोर्ट पुणे.

क्रि.अर्ज नं. ६१२६/२०२४

सिंहगड रोड पोलिस स्टेशन

गु.र.नं.०६९१/२०२४

**श्री.अशोक बन्सिलाल पटेल**

वय : २६ वर्षे, धंदा : (ज्वेलर्स)व्यवसाय ,

रा.श्रीगंगा गॅलेक्सी, फ्लॅट नं.४०६,

बी.विंग, वडगांव बुद्रुक,पुणे --- अर्जदार

विरूध्द

**महाराष्ट्र सरकार**

(सिंहगड रोड पोलिस स्टेशन) ---जाबदेणार

ORDER
Call say of I.O. & APP.
Digitally signed by SAVITA KISHANRAO DUGAONKAR Date: 2025.01.07 16:21:11 +0530
JMFC (A.C.) Court, Pune
07/01/2025

**अर्ज : जप्त मुद्देमाल प्रॉपर्टी बॉण्डवर परत मिळणेबाबत अर्ज.**

सदरील अर्जदार या मे.न्यायालयास नम्रपणे विनंती करतात.

सदर घटनेची थोडक्यात हकीकत असे की,

१) अर्जदार यांचे ''ज्योतींलिंग अपार्टमेंट'' शॉप नं.७, पंचांली स्विटशेजारी, वडगाव बु. पुणे येथे ''भाग्यल मी ज्वेलर्स'' या नावाने ज्वेलर्सचे दुकान आहे. सदर दुकानाची वेळ सकाळी १०.०० ते रात्री १०.०० वा.पर्यंत असे आहे.

२) दिनांक २२/११/२०२४ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास नेहमीप्रमाणे अर्जदाराने दुकान उघडले. दुपारी २.३०वा. सुमारास अर्जदार दुकानामध्ये एकटे असताना एक अनोळखी कस्टमर गळ्यातील सोन्याची चैन खरेदी करण्यासाठी दुकानात आला. त्यावेळी त्याने त्याची दुचाकी गाडी दुकानाचे बाहेरील सार्वजनिक